
06 AUG 2026

# डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनामुळे शैक्षणिक महामेरू हरपला: कुलगुरू डॉ. राजनीश कामत



कोल्हापूर : ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनामुळे शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग कामगिरी बजावणारे महामेरू व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे, अशी शोकभावना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी व्यक्त केली.

कुलगुरू डॉ. कामत यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे की, शिक्षणमहर्षी डॉ. डी. वाय. पाटील यांनी आधुनिक महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासात अतिशय महत्त्वाचे योगदान दिले. राज्याबरोबरच देशाच्या शैक्षणिक विकासासाठी त्यांनी अत्यंत ध्येयनिष्ठपणे काम करीत असताना व्यावसायिक शिक्षणाचा विकास व विस्तार यांसाठी त्यांनी अव्याहत परिश्रम घेतले. त्यांच्या या परिश्रमातूनच डी.वाय. पाटील समूहाचा शैक्षणिक वृक्ष विस्तारला. व्यावसायिक शिक्षणाच्या प्रवाहात सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांचे समावेशन डॉ. पाटील यांच्यामुळे शक्य झाले. त्यांच्या या योगदानाची (पान ३ वर)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 AUG 2026

आपले वृत्त

# डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनामुळे शैक्षणिक महामेरू हरपला: कुलगुरू डॉ. राजनीश कामत

(पान १ वरुन) दखल घेऊन शिवाजी विद्यापीठाने त्यांना सन २०१५ मध्ये डी. लिट. ही सर्वोच्च पदवी देऊन गौरविले. त्याचप्रमाणे सन २०२२ मध्ये विद्यापीठाचा प्राचार्य डॉ. रा.कृ. कणबरकर पुरस्कारही प्रदान केला. या पुरस्काराच्या रकमेच स्वतः कडील दहा लाख रुपयांच्या निधीची भर घालून संत साहित्याच्या क्षेत्रात प्रभावी कामगिरी करणाऱ्या व्यक्तींसाठी पुरस्कार योजना सुरू करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली होती. त्यानुसार विद्यापीठाने 'पद्मश्री डॉ. डी.वाय. पाटील पुरस्कार' प्रदान करण्यास सुरवात केली.

डॉ. पाटील यांचा शिवाजी विद्यापीठ परिवाराशी प्रगाढ स्नेह होता.

हा स्नेहभाव अखेरच्या क्षणापर्यंत कायम राहिला. त्यांच्या निधनामुळे शिवाजी विद्यापीठ परिवारावरही दुःखाची छाया पसरली आहे. डॉ. पाटील यांना चिरशांती लाभो, अशी भावनाही कुलगुरूंनी व्यक्त केली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
दै. वर्तमान
06 AUG 2026

# लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विश्वात्मक दृष्टीचे प्रगल्भ विचारवंत : डॉ. श्रीपाल सबनीस



**कोल्हापूर/प्रतिनिधी :**
बहुसांस्कृतिक जाणीवा असणारे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हे विश्वात्मक दृष्टीचे साहित्यिक होते, तसेच प्रगल्भ आणि परिपक्व विचारवंत म्हणूनही त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासनाच्या वतीने जयंतीनिमित्त आयोजित 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची सांस्कृतिक भूमिका' या विषयावरील एकदिवसीय चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभात बीजभाषण करताना ते आज बोलत होते. कुलसचिव डॉ. विलास शिंदे अध्यक्षस्थानी होते.

अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा आणि विचारांचा व्यापक पट उलगडताना सबनीस यांनी त्यांना केवळ शाहिर किंवा लोककलावंत म्हणून मर्यादित न पाहता, समतेचा, स्वातंत्र्याचा आणि मानवतावादाचा साक्षेपी विचार मांडणारा विश्वात्मक दृष्टीचा साहित्यिक म्हणून अधोरेखित केले. ते म्हणाले, अण्णा भाऊंच्या लेखणीमध्ये शोषण, जातिव्यवस्था, भांडवलशाही, ब्राह्मण्य आणि विषमतावादी व्यवस्थेविरुद्धचा संघर्ष दिसून येतो; मात्र त्याचबरोबर त्यांच्यात संवादशीलता, समन्वयशीलता आणि सर्वसमावेशकताही होती. मार्क्स, आंबेडकर, फुले, शिवाजी महाराज, ज्ञानेश्वर, तुकडोजी महाराज अशा विविध वैचारिक-सांस्कृतिक प्रवाहांचे संचित त्यांनी आत्मसात केले होते. अण्णा भाऊंच्या कादंबऱ्या, शाहिरी, वगनाट्य आणि लोकनाट्यांमधून महाराष्ट्र, भारत आणि विश्वमानवतेचा व्यापक विचार व्यक्त होतो. त्यांचे साहित्य हे केवळ दलित किंवा एका जातीपुरते मर्यादित नसून सर्वसमावेशक, बहुसांस्कृतिक आणि जागतिक मूल्यांचे प्रतिनिधित्व करणारे आहे, असे सबनीस यांनी स्पष्ट केले.

ते म्हणाले, अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यविश्वाचा अभ्यास करताना त्यांच्या लेखनातील लोकजीवनाची खोल जाण, सामान्य माणसाविषयीची आस्था आणि सामाजिक वास्तवाचे तटस्थ चित्रण प्रकर्षाने जाणवते. त्यांच्या कथांमधून केवळ दुःख, दारिद्र्य किंवा संघर्षच नव्हे, तर माणूसपणावरचा अढळ विश्वास आणि परिवर्तनाची उमेदही व्यक्त होते. आजच्या काळात अण्णा भाऊंच्या विचारांची अधिकाधिक गरज असून त्यांच्या साहित्याचा अभ्यास समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. अण्णा भाऊंनी मांडलेली समतेची, बंधुत्वाची आणि न्यायाची भूमिका ही नव्या पिढीला दिशा देणारी असून, त्यांचे साहित्य हे केवळ वाचनापुरते न राहता आचार-विचारांना प्रेरणा देणारे जीवनमूल्य आहे, असेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, महामानवांची जातीजातींत वाटणी होणे गैर असून केवळ अस्मिता म्हणून त्यांना मिरविण्यापेक्षा त्यांच्या विचारांचा गांभीर्यपूर्वक स्वीकार केला जाणे आवश्यक आहे. अण्णा भाऊ साठे यांनी लौकिकार्थाने शिक्षण नसतानाही निसर्गवाचन, परिसर वाचन, माणसांचं वाचन, वास्तव जीवनातील चटके आणि अनुभव यांच्यावर चिंतन केले. जागतिक साहित्याचे वाचन केले. त्यातून त्यांच्यात लेखन प्रेरणा जागल्या आणि वास्तव, आदर्श व त्यांच्या स्वप्नातील समाज यांचा मेळ घालत त्यांनी साहित्य निर्मिती केली. हा आदर्श आजच्या पिढीने घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

**'अण्णा भाऊंचा सांस्कृतिक हस्तक्षेप मौलिक'**

उद्घाटन सत्रानंतर झालेल्या परिसंवादात अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून तत्कालीन अभिजन सांस्कृतिक जाणीवांमध्ये जो हस्तक्षेप केला, तो अत्यंत मौलिक स्वरुपाचा होता. त्यामुळे साहित्याच्या मुख्य प्रवाहामध्ये दलित, शोषितांचा आवाज बुलंद झाला, असा सूर निघाला. या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी डॉ. गिरीष मोरे होते. परिसंवादात डॉ. मेघा पानसरे यांनी 'अण्णा भाऊंचे आंतरराष्ट्रीयत्व', जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी 'अण्णा भाऊंच्या साहित्यातील फुले-आंबेडकरी जाणीवा' आणि डॉ. अंबादास सकट यांनी 'महाराष्ट्राचे शेक्सपिअर अण्णा भाऊ साठे' या विषयांवर मांडणी केली.

यावेळी अनिकेत कांबळे या विद्यार्थ्याने अण्णा भाऊ साठे यांना रॅप साँगद्वारे अभिवादन केले. अध्यासनाचे समन्वयक डॉ. अक्षय सरवदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. शुभदा पाटील यांनी परिचय करून दिला. मनीषा कदम-देसाई, सरिता बनके यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. प्रभंजन माने यांनी आभार मानले. कार्यक्रमाला डॉ. ललिता सबनीस, डॉ. किसनराव कुराडे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. शरद गायकवाड, डॉ. मच्छिंद्र गोफणे, डॉ. कबीर दास, डॉ. उत्तम सकट, डॉ. नीलेश बनसोडे, विलास सोयम, अनिल म्हमाणे यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

0 6 AUG 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विश्वात्मक दृष्टीचे प्रगल्भ विचारवंत : डॉ. श्रीपाल सबनीस

कोल्हापूर : बहुसांस्कृतिक जाणीवा असणारे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हे विश्वात्मक दृष्टीचे साहित्यिक होते, तसेच प्रगल्भ आणि परिपक्व विचारवंत म्हणूनही त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासनाच्या वतीने जयंतीनिमित्त आयोजित 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची सांस्कृतिक भूमिका' या विषयावरील एकदिवसीय चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभात बीजभाषण करताना ते आज बोलत होते. कुलसचिव डॉ. विलास शिंदे अध्यक्षस्थानी होते.

अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा आणि विचारांचा व्यापक पट उलगडताना सबनीस यांनी त्यांना केवळ शाहिर किंवा लोककलावंत म्हणून मर्यादित न पाहता, समतेचा, स्वातंत्र्याचा आणि मानवतावादाचा साक्षेपी विचार मांडणारा विश्वात्मक दृष्टीचा साहित्यिक म्हणून अधोरेखित केले. ते म्हणाले, अण्णा भाऊंच्या लेखणीमध्ये शोषण, जातिव्यवस्था, भांडवलशाही, ब्राह्मण्य आणि विषमतावादी व्यवस्थेविरुद्धचा संघर्ष दिसून येतो; मात्र त्याचबरोबर त्यांच्यात संवादशीलता,



समन्वयशीलता आणि सर्वसमावेशकताही होती. मार्क्स, आंबेडकर, फुले, शिवाजी महाराज, ज्ञानेश्वर, तुकडोजी महाराज अशा विविध वैचारिक-सांस्कृतिक प्रवाहांचे संचित त्यांनी आत्मसात केले होते.

अण्णा भाऊंच्या कादंबऱ्या, शाहिरी, वगनाट्य आणि लोकनाट्यांमधून महाराष्ट्र, भारत आणि विश्वमानवतेचा व्यापक विचार व्यक्त होतो. त्यांचे साहित्य हे केवळ दलित किंवा एका जातीपुरते मर्यादित नसून सर्वसमावेशक, बहुसांस्कृतिक आणि जागतिक मूल्यांचे प्रतिनिधित्व करणारे आहे, असे सबनीस यांनी स्पष्ट केले.

ते म्हणाले, अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यविश्वाचा अभ्यास करताना त्यांच्या लेखनातील लोकजीवनाची खोल जाण, सामान्य माणसाविषयीची आस्था आणि सामाजिक वास्तवाचे तटस्थ चित्रण प्रकर्षाने जाणवते. त्यांच्या कथांमधून केवळ दुःख, दारिद्र्य किंवा संघर्षच नव्हे, तर माणूसपणावरचा अढळ विश्वास आणि परिवर्तनाची उमेदही व्यक्त होते. आजच्या काळात अण्णा भाऊंच्या विचारांची अधिकाधिक गरज असून त्यांच्या साहित्याचा अभ्यास समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. अण्णा भाऊंनी मांडलेली समतेची, बंधुत्वाची आणि न्यायाची भूमिका ही नव्या पिढीला दिशा देणारी असून, त्यांचे साहित्य हे केवळ वाचनापुरते न राहता आचार-विचारांना प्रेरणा देणारे जीवनमूल्य आहे, असेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, महामानवांची जातीजातींत वाटणी होणे गैर असून केवळ अस्मिता म्हणून त्यांना मिरविण्यापेक्षा त्यांच्या विचारांचा गांभीर्यपूर्वक स्वीकार केला जाणे आवश्यक आहे. अण्णा भाऊ साठे यांनी लौकिकार्थाने शिक्षण नसतानाही निसर्गवाचन, परिसर वाचन, माणसांचं वाचन, वास्तव जीवनातील चटके आणि अनुभव यांच्यावर चिंतन केले. जागतिक साहित्याचे वाचन केले. त्यातून त्यांच्यात लेखन प्रेरणा जागल्या आणि वास्तव, आदर्श व त्यांच्या स्वप्नातील समाज यांचा मेळ घालत त्यांनी साहित्य निर्मिती केली.

0 6 AUG 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अण्णा भाऊ विश्वात्मक दृष्टीचे साहित्यिक

## डॉ. सबनीस : 'साठेंची सांस्कृतिक भूमिका'वर विद्यापीठात चर्चासत्र

कोल्हापूर, ता. ५ : 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य केवळ वाचनापुरते न राहता आचार-विचारांना प्रेरणा देणारे जीवनमूल्य आहे. बहुसांस्कृतिक जाणिवा असणारे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विश्वात्मक दृष्टीचे साहित्यिक होते,' असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासनातर्फे अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त झालेल्या 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची सांस्कृतिक भूमिका' या विषयावरील एकदिवसीय चर्चासत्रात ते बोलत होते.



डॉ. सबनीस

अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

डॉ. सबनीस म्हणाले, 'अण्णा भाऊंचे प्रगल्भ आणि परिपक्व विचारवंत म्हणून योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या साहित्याचा व विचारांचा पट व्यापक आहे. त्यांना केवळ शाहीर किंवा लोककलावंत म्हणून मर्यादित न पाहता समतेचा, स्वातंत्र्याचा व मानवतावादाचा साक्षेपी विचार मांडणारा विश्वात्मक दृष्टीचा साहित्यिक म्हणून पाहावे लागेल. त्यांच्या लेखणीत शोषण, जाती व्यवस्था, भांडवलशाही, ब्राह्मण्य व विषमतावादी व्यवस्थेविरुद्धचा संघर्ष दिसून येतो. त्यांचे साहित्य केवळ दलित किंवा एका जातीपुरते मर्यादित नव्हते.'

परिसंवादात डॉ. मेघा पानसरे यांनी 'अण्णा भाऊंचे आंतरराष्ट्रीयत्व', डॉ. आलोक जत्राटकर यांनी 'अण्णा भाऊंच्या साहित्यातील फुले-आंबेडकरी जाणिवा, डॉ. अंबादास सकट यांनी 'महाराष्ट्राचे शेक्सपियर अण्णा भाऊ साठे' या विषयावर मांडणी केली. डॉ. गिरीश मोरे अध्यक्षस्थानी होते. यावेळी डॉ. ललिता सबनीस, डॉ. किसनराव कुराडे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. शरद गायकवाड, डॉ. मच्छिंद्र गोफणे आदी उपस्थित होते.

06 AUG 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अण्णा भाऊ साठे हे थोर, प्रगल्भ विचारवंत

## डॉ. श्रीपाल सबनीस : 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची सांस्कृतिक भूमिका' या विषयावर चर्चासत्र

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्याकडे बहुसांस्कृतिक जाणीवा होत्या. ते खऱ्या अर्थाने विश्वात्मक दृष्टीचे साहित्यिक होते. प्रगल्भ आणि परिपक्व विचारवंत म्हणूनही त्यांचे समाजासाठी योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासनतर्फे अण्णा भाऊ साठे यांची जयंतीसाठी साजरी करण्यात आली. यानिमित्त 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची सांस्कृतिक भूमिका' या विषयावर एकदिवसीय चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते.



**कोल्हापूर : चर्चासत्राच्या उद्घाटनपर कार्यक्रमात बोलताना डॉ. श्रीपाल सबनीस. सोबत डॉ. सरवदे, डॉ. विलास शिंदे व डॉ. प्रभंजन माने.**

डॉ. सबनीस म्हणाले की, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, तुकडोजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मार्क्स, यांच्या विचारांच्या प्रवाहांचे संचित अण्णाभाऊंनी आत्मसात केले होते.

कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, महामानवांची जातीजातींत वाटणी करणे गैर आहे. महामानवांना अस्मिता म्हणून मिरविण्यापेक्षा त्यांच्या विचारांचा स्वीकार होणे गरजेचे आहे.

परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी डॉ. गिरीष मोरे होते. डॉ. मेघा पानसरे यांनी 'अण्णा भाऊंचे आंतरराष्ट्रीयत्व', शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी 'अण्णा भाऊंच्या साहित्यातील फुले-आंबेडकरी जाणीवा' आणि डॉ. अंबादास सकट यांनी 'महाराष्ट्राचे शेक्सपिअर अण्णा भाऊ साठे' या विषयांची मांडणी केली.

अध्यासनाचे समन्वयक डॉ. अक्षय सरवदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. शुभदा पाटील यांनी डॉ. सबनीस यांचा परिचय करून दिला. मनीषा कदम-देसाई, सरिता बनके यांनी सूत्रसंचालन केले. तर डॉ. प्रभंजन माने यांनी आभार मानले.

0 6 AUG 2026
सकाळ




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या हिंदी विभागातर्फे झालेल्या व्याख्यानात डॉ. बी. एम. हिर्डेकर यांचे स्वागत करताना डॉ. कृष्णा पाटील.

# ग्रंथ माणसाला संवेदनशील, विवेकी बनवितात : डॉ. बी. एम. हिर्डेकर

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ५ : ग्रंथ हे केवळ ज्ञानाचे साधन नसून ते माणसाला विचारशील, संवेदनशील व विवेकी बनवतात. म्हणूनच ग्रंथ हे जीवनाचे खरे मार्गदर्शक आहेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या हिंदी विभागातर्फे झालेल्या 'ग्रंथ हेच गुरू' विषयावरील ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील अध्यक्षस्थानी होते.

डॉ. हिर्डेकर म्हणाले, 'गुरू आयुष्यात जे काही देऊ इच्छितात, त्याचे शाश्वत रूप म्हणजे ग्रंथ. ग्रंथ प्रत्येकाच्या आयुष्यातील निःशब्द सहप्रवासी आहेत. साहित्याचे वाचन करताना लेखकांची आत्मचरित्रे, चरित्रे आणि वैचारिक साहित्य यांचाही अभ्यास केला पाहिजे. त्यातून संवेदनशीलता, समाजभान, जनभान आणि मूल्यदृष्टी विकसित होते.'

पाटील म्हणाले, 'ग्रंथ हे व्यक्तिमत्त्व विकासाला दिशा देणारे खरे गुरू आहेत. डिजिटल युगातही वाचन संस्कृती जोपासणे ही काळाची गरज आहे.' उपकुलसचिव विनय शिंदे, दिलीप मोहाडीकर, प्रा. डॉ. महावीर पाटील, स्वाती पाटील उपस्थित होते. डॉ. संजय चोपडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नितीन रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रसाद दावणे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
0 6 AUG 2026
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ग्रंथ माणसाला विवेकी बनवतात : डॉ. बी. एम. हिर्डेकर




कोल्हापूर : ग्रंथ हे केवळ ज्ञानाचे साधन नसून ते माणसाला विचारशील, संवेदनशील आणि विवेकी बनवतात. म्हणूनच ग्रंथ हे जीवनाचे खरे मार्गदर्शक आहेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या हिंदी विभागातर्फे आयोजित ''ग्रंथ हेच गुरु'' या विषयावरील ऑनलाइन व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील होते. यावेळी उपकुलसचिव विनय शिंदे, दिलीप मोहाडीकर, प्रा. डॉ. महावीर पाटील, स्वाती पाटील तसेच विद्यार्थी, शिक्षक आणि ज्ञानप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. हिर्डेकर म्हणाले की, गुरु आयुष्यात जे काही देऊ इच्छितात, त्याचे शाश्वत रूप म्हणजे ग्रंथ. ग्रंथ हे प्रत्येकाच्या आयुष्यातील निःशब्द सहप्रवासी आहेत. साहित्याचे वाचन करताना लेखकांची आत्मचरित्रे, चरित्रे आणि वैचारिक साहित्य यांचाही अभ्यास केला पाहिजे. त्यातून संवेदनशीलता, समाजभान, जनभान आणि मूल्यदृष्टी विकसित होते.

तुकाराम, कबीर, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बहिणाबाई चौधरी, वि. स. खांडेकर, ग्रेस आणि शेक्सपिअर यांसारख्या साहित्यिकांचे लेखन प्रत्येकाने वाचले पाहिजे. पुस्तके सत्यशोधन, सौजन्य, विवेक आणि सृजनशीलतेचे संस्कार घडवितात, असेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. कृष्णा पाटील म्हणाले की, ग्रंथ हे व्यक्तिमत्त्व विकासाला दिशा देणारे खरे गुरु आहेत. डिजिटल युगातही वाचन संस्कृती जोपासणे ही काळाची गरज आहे. प्रत्येकाने विविध विषयांवरील दर्जेदार पुस्तके आपल्या संग्रही ठेवून नियमित वाचनाची सवय विकसित केली पाहिजे. ग्रंथांमधूनच ज्ञानाबरोबर मूल्यसंस्कार आणि जीवनदृष्टी प्राप्त होत असल्याने त्यांचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. स्वागत व प्रास्ताविक डॉ. संजय चोपडे यांनी सूत्रसंचालन डॉ. नितीन रणदिवे यांनी केले.

0 6 AUG 2026

सिंधुदुर्ग समाचार

# थोडक्यात वाचा

## ग्रंथ माणसाला विवेकी बनवतात : डॉ. बी. एम. हिर्डेकर

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

ग्रंथ हे केवळ ज्ञानाचे साधन नसून ते माणसाला विचारशील, संवेदनशील आणि विवेकी बनवतात. म्हणूनच ग्रंथ हे जीवनाचे खरे मार्गदर्शक आहेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या हिंदी विभागातर्फे आयोजित 'ग्रंथ हेच गुरु' या विषयावरील ऑनलाइन व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील होते. यावेळी उपकुलसचिव श्री. विनय शिंदे, श्री. दिलीप मोहाडीकर, प्रा. डॉ. महावीर पाटील, श्रीमती स्वाती पाटील तसेच विद्यार्थी, शिक्षक आणि ज्ञानप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


डॉ. हिर्डेकर म्हणाले की, गुरु आयुष्यात जे काही देऊ इच्छितात, त्याचे शाश्वत रूप म्हणजे ग्रंथ. ग्रंथ हे प्रत्येकाच्या आयुष्यातील निःशब्द सहप्रवासी आहेत. साहित्याचे वाचन करताना लेखकांची आत्मचरित्रे, चरित्रे आणि वैचारिक साहित्य यांचाही अभ्यास केला पाहिजे. त्यातून संवेदनशीलता, समाजभान, जनभान आणि मूल्यदृष्टी विकसित होते. तुकाराम, कबीर, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बहिणाबाई चौधरी, वि. स. खांडेकर, ग्रेस आणि शेक्सपिअर यांसारख्या साहित्यिकांचे लेखन प्रत्येकाने वाचले पाहिजे. पुस्तके सत्यशोधन, सौजन्य, विवेक आणि सृजनशीलतेचे संस्कार घडवितात, असेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. कृष्णा पाटील म्हणाले की, ग्रंथ हे व्यक्तिमत्त्व विकासाला दिशा देणारे खरे गुरु आहेत. डिजिटल युगातही वाचन संस्कृती जोपासणे ही काळाची गरज आहे. प्रत्येकाने विविध विषयांवरील दर्जेदार पुस्तके आपल्या संग्रही ठेवून नियमित वाचनाची सवय विकसित केली पाहिजे. ग्रंथांमधूनच ज्ञानाबरोबर मूल्यसंस्कार आणि जीवनदृष्टी प्राप्त होत असल्याने त्यांचे महत्त्व अधिक अधोरेखित होते.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. संजय चोपडे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. नितीन रणदिवे यांनी केले, तर डॉ. प्रसाद दावणे यांनी आभार मानले.

0 6 AUG 2026

कुमारक्रांती




# शिवाजी विद्यापीठामध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आज उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये आज सकाळी कुलगुरू डॉ.राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ.ज्योती जाधव यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ.विलास शिंदे, डॉ.रामचंद्र पवार, डॉ.रणधीर शिंदे, डॉ.एस.जी.घाणे, अध्यासनाचे समन्वयक डॉ.ए.एम.सरवदे, डॉ.प्रभंजन माने, डॉ.तृप्ती करेकट्टी, डॉ.आर.जी.बारवेकर, डॉ.एम.एस. वासवाणी, डॉ.धनंजय सुतार, डॉ.मचंछिद्र गोफणे, उपकुलसचिव डॉ.विभा अंत्रेडी, डॉ.उत्तम सकट, डॉ.निलेश बनसोडे, सुरेश बंडगर, सुरेखा आडके, अनिल साळोखे, अरविंद पाटील, बाबुराव तिळणे यांचेसह विद्यार्थी, विद्यार्थीनी, प्रशासकीय सेवक, अधिकारी आणि शिक्षक मोठया संख्येने उपस्थित होते. दरम्यान, विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागामध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. रुपाली संकपाळ, डॉ. विद्यानंद खंडागळे, रत्नदीप पाटील, रुचिता थरोली, सना शेख, प्रवीण मोरे, शुभम गायकवाड यांचेसह अधिविभागातील प्राध्यापक, शिक्षक, संशोधक विद्यार्थी, एम.एड., बी.एड., एम.एड. एकात्मिक आणि बी.एस्सी.-बी.एड. चे प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

0 6 AUG 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# शिवाजी विद्यापीठामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती आज उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये आज सकाळी कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ.ज्योती जाधव यांच्या हस्ते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ.विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ.सुहासिनी पाटील, डॉ. शरद बनसोडे, डॉ.रामचंद्र पवार, प्राणीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ.शिवानंद यंकंची, डॉ. आशिष देशमुख, डॉ.नितीन कांबळे, डॉ.माधव भिलावे, डॉ.सुनिल गायकवाड, सुरेश बंडगर, प्रकाश चौगुले, सिमा कुंभार, दत्तात्रय भालचिम, जनार्धन सुरकुले, संजय पवार, संजय माने, दत्तात्रय पोतदार, विजय घोडके, शरद कांबळे, प्रतिक बुवा, कल्लाप्पा कारंडे यांचेसह विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्रशासकीय सेवक, अधिकारी उपस्थित होते.

0 6 AUG 2026

वर्तमान


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## २१ व्या कोल्हापूर परीक्षेत्रीय पोलीस कर्तव्य मेळाव्याचे उत्साहात उद्घाटन

# आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरावर भर

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** बदलत्या तांत्रिक युगात पोलीस दलाने कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), ड्रोन, वैज्ञानिक तपास पद्धती आणि सायबर सुरक्षेसारख्या आधुनिक साधनांचा प्रभावी वापर करून अधिक सक्षम व तंत्रसज्ज होणे काळाची गरज असल्याचा सूर 21 व्या कोल्हापूर परीक्षेत्रीय पोलीस कर्तव्य मेळावा–2026 च्या उद्घाटन समारंभात उमटला.

या प्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत, कोल्हापूर परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक रंजनकुमार शर्मा, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, पोलीस अधीक्षक नीलोत्पल, प्र. कुलगुरू ज्योती जाधव तसेच अपर पोलीस अधीक्षक अण्णा जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. कोल्हापूर परीक्षेत्रातील पाच जिल्ह्यांतील पोलीस अधिकारी, अंमलदार आणि खेळाडूंनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.



कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी पोलीस कर्तव्य मेळाव्यांमुळे पोलीस दलाचे ज्ञान, कौशल्य आणि कार्यक्षमता वाढण्याबरोबरच अनुभवांची देवाणघेवाण होऊन तपास प्रक्रियेत अधिक गुणवत्ता येत असल्याचे सांगितले.

विशेष पोलीस महानिरीक्षक रंजनकुमार शर्मा यांनी पोलीस कर्तव्य मेळावा हा पोलीस दलाच्या व्यावसायिक कौशल्यवृद्धीसाठी महत्त्वाचा उपक्रम असल्याचे सांगितले. गुन्हे प्रतिबंध आणि गुन्ह्यांच्या तपासात कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन, वैज्ञानिक तपास, पोलीस छायाचित्रण, व्हिडीओग्राफी, संगणक जागरूकता आणि श्वानपथकाचा प्रभावी वापर अनिवार्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. स्पर्धकांनी राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये यश मिळवून परीक्षेत्राचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी गुन्हे तपास, कायदा व सुव्यवस्था आणि सायबर सुरक्षेसारख्या क्षेत्रांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यावर भर देत नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेविषयी जागरूकता वाढविणे ही काळाची गरज असल्याचे नमूद केले.

पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी पोलीस दल हे केवळ कायद्याच्या अंमलबजावणी पुरतेच मर्यादित नसून नसून समाजात न्याय, सुरक्षितता आणि विश्वास निर्माण करणारी जबाबदार संस्था असल्याचे अधोरेखित केले. सायबर गुन्हे, डिजिटल पुरावे आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर पोलीस दलाने सातत्याने अद्ययावत राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात व्हीआयपी सुरक्षा व्यवस्थेचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. सातारा जिल्ह्यातील पोलीस अंमलदार आकाश काशिद यांनी काही मिनिटांत जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांचे रेखाचित्र साकारून उपस्थितांची वाहवा मिळविली. अपर पोलीस अधीक्षक अण्णा जाधव यांनी उपस्थितांचे आभार मानले.

06 AUG 2026

आरंभ - वृत्त

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरावर भर; २१ व्या कोल्हापूर परीक्षेत्रीय पोलीस कर्तव्य मेळाव्याचे उत्साहात उद्घाटन


कोल्हापूर : बदलत्या तांत्रिक युगात पोलीस दलाने कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन, वैज्ञानिक तपास पद्धती आणि सायबर सुरक्षेसारख्या आधुनिक साधनांचा प्रभावी वापर करून अधिक सक्षम व तंत्रसज्ज होणे काळाची गरज असल्याचा सूर २१ व्या कोल्हापूर परीक्षेत्रीय पोलीस कर्तव्य मेळावा२०२६ च्या उद्घाटन समारंभात उमटला.

या प्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत, कोल्हापूर परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक रंजनकुमार शर्मा, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, पोलीस अधीक्षक नीलोत्पल, प्र. कुलगुरू ज्योती जाधव तसेच अपर पोलीस अधीक्षक अण्णा जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. कोल्हापूर परीक्षेत्रातील पाच जिल्ह्यांतील पोलीस अधिकारी, अंमलदार आणि खेळाडूंनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी पोलीस कर्तव्य मेळाव्यांमुळे पोलीस दलाचे ज्ञान, कौशल्य आणि कार्यक्षमता वाढण्याबरोबरच अनुभवांची देवाणघेवाण होऊन तपास प्रक्रियेत अधिक गुणवत्ता येत असल्याचे सांगितले.

विशेष पोलीस महानिरीक्षक रंजनकुमार शर्मा यांनी पोलीस कर्तव्य मेळावा हा पोलीस दलाच्या व्यावसायिक कौशल्यवृद्धीसाठी महत्त्वाचा उपक्रम असल्याचे सांगितले. गुन्हे प्रतिबंध आणि गुन्ह्यांच्या तपासात कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन, वैज्ञानिक तपास, पोलीस छायाचित्रण, व्हिडीओग्राफी, संगणक जागरूकता आणि श्वानपथकाचा प्रभावी वापर अनिवार्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. स्पर्धकांनी राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये यश मिळवून परीक्षेत्राचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी गुन्हे तपास, कायदा व सुव्यवस्था आणि सायबर सुरक्षेसारख्या क्षेत्रांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यावर भर देत नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेविषयी जागरूकता वाढविणे ही काळाची गरज असल्याचे नमूद केले.



पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी पोलीस दल हे केवळ कायद्याच्या अंमलबजावणी पुरतेच मर्यादित नसून नसून समाजात न्याय, सुरक्षितता आणि विश्वास निर्माण करणारी जबाबदार संस्था असल्याचे अधोरेखित केले. सायबर गुन्हे, डिजिटल पुरावे आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर पोलीस दलाने सातत्याने अद्ययावत राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात व्हीआयपी सुरक्षा व्यवस्थेचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. सातारा जिल्ह्यातील पोलीस अंमलदार आकाश काशिद यांनी काही मिनिटांत जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांचे रेखाचित्र साकारून उपस्थितांची वाहवा मिळविली.